# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** वाशिम **P.S.(ठाणे):** धणज
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0284 **Year (वर्ष):** 2025
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 29/10/2025 12:41

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** गुरूवार **Date From (दिनांक पासून):** 14/08/2025
**Time Period (कालावधी):** **Date To ( दिनांक पर्यंत):** 14/08/2025
**Time From (वेळेपासून):** 19:25 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 22:50 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 29/10/2025 **Time (वेळ):** 12:18 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 020
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 29/10/2025 12:18 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
दक्षिण, 15 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** कांमरंगाव चौकी परीसर ,कारंजा

(c) **In case, outside the limit of this Police Station, then** (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**

6. **Complainant / Informant** (तक्रारदार/माहिती देणारा):

(a) **Name** (नाव): सर तर्फे अल्का मोहन गायकवाड

(b) **Father's/Husband's Name**(वडील / पती चे नाव) :

(c) **Date/Year of Birth** (जन्म तारीख/वर्ष): 1987

(d) **Nationality** (राष्ट्रीयत्व): भारत

(e) **UID No.** (यु.आय.डी. क्र.):

(f) **Passport No.**(पारपत्र क्र.):

**Date of Issue** (दिल्याची तारीख):

**Place of Issue** (दिल्याचे ठिकाण):

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address** (पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | लाप्रवि वाशिम ,वाशिम ,धणज ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | लाप्रवि वाशिम ,वाशिम ,धणज ,वाशिम,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation** (व्यवसाय):

(j) **Phone number** (फोन नं.):

**Mobile** (मोबाइल नं.): 91-8329033177

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars** (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | शेखर श्रीधर तायडे | | | 1. श्रध्दा नगर क्र 3 कौलखेड अकोला,अकोला ,खदान, अकोला,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant** (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):

9. **Particulars of properties of interest** (संबंधीत मालमत्तेचा तपशील):

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 3000 रुपये | 3,000.00 |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

3,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद

लाप्रवि वाशिम कॅम्प पो. स्टे. धनज दिनांक:-29/10/2025
मी अल्का मोहन गायकवाड,वय 38 वर्ष, व्यवसाय- नोकरी, पद- पोलीस निरीक्षक,लाचलुचपत प्रतिबंधक विभाग वाशिम,मो.नं.8329033177 मी आज रोजी सरतर्फे समक्ष फिर्याद देते की, मी लाचलुचपत प्रतिबंध विभाग वाशिम येथे पोलीस निरीक्षक म्हणुन दि.04/09/2024 पासुन कार्यरत आहे. दि.14/08/2025 रोजी लाप्रवि कार्यालय वाशिम येथे कर्तव्यावर हजर असतांना मला खेर्डा येथुन एका ईसमाचा फोन आला.त्यांनी फोनवर लोकसेवाकविरुध्द लाच मागणी बाबत तक्रार असल्याबाबत सांगीतल्याने आम्ही तात्काळ मा.जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय वाशिम यांना पत्र देउन दोन शासकिय पंच उपलब्ध करुन घेतले त्यानंतर आम्ही,सापळा पथक व पंच असे शासकिय वाहनाने ग्राम खेर्डा ता.कारंजा येथे जाउन तक्रारदार यांची भेट घेतली असता,त्यांनी त्यांचे नाव संजय वामनराव कोल्हे, वय 56 वर्ष, व्यवसाय ड्रायव्हींग, रा.कामरगांव,ता.कारंजा (लाड) जि.वाशिम असे सांगीतले.त्यावेळी आम्ही त्यांना सापळा पथक तसेच दोन्ही पंचांची ओळख करुन देवुन त्यांची तक्रार नोंदवुन घेतली ती पुढीलप्रमाणे, " मी वरील प्रमाणे कामरगांव येथील रहिवाशी असुन ड्रायव्हींग चा जॉब करतो.दि. 06/08/2025रोजी बुधवार ला मी दुपारी अंदाजे 04/00 वा.दरम्यान नदिवरील मरामाय मंदीरावर दर्शनाकरीता माझी दुचाकी क्र.MH.37.AK.5276 नी गेलो होतो. मी मंदीराबाहेर गाडी उभी करुन मंदीरात दर्शनाकरीता गेलो. दर्शन करुन बाहेर आलो असता. बिहारीलाल काकांनी यांचे रेच्यावर कापुस गलाई केन्द्र येथे गर्दी दिसली त्यामुळे मी तेथे थांबलो असता मला पोलीस चैकी इन्चार्ज आणि शेखर तायडे (शिपाई) हे दोघे मला रेच्यावर आल्याचे दिसले व लोकांची धावपळ सुरु झाली.त्यामुळे मला असे समजले की,येथे जुगारावरती पोलीस रेड पडली आहे.त्यामुळे मी माझी गाडी घेवुन माझ्या घरी परत आलो.काल दि.13/08/2025 रोजी बुधवारी सकाळी शेखर तायडे यांचा मला कॉल आला होता. परंतु तो कॉल माझे कडुन मिस झाला.त्यामुळे मी त्यांना त्यांचे मोबाईल क्र.9067188485 या नंबरवर कॉल केला असता.शेखर तायडे यांनी मला जुगार रेड बदल बोलुन माझे नांव जुगार केस मध्ये न टाकण्यासाठी तसेच माझी दुचाकी जप्त न करण्यासाठी मला रुपये 5000/-(पाच हजार) ची मागणी केली.त्यानंतर मी चौकशी केली असता त्या दिवशी झालेल्या जुगार रेड संबंधाने पोलीस चौकी कामरगांव येथे जुगार गुन्हा दाखल नसल्याचे मला समजले.तसेच जुगार रेडशी माझा काहीही संबंध नाही.शेखर तायडे (शिपाई) हे मला जुगारच्या गुन्हयात अडकविण्याकरीता तसेच माझी दुचाकी जप्त करतो अशी धमकी देवुन माझे कडे रु.5000/-ची लाच मागणी करीत आहे.त्यांचेशी माझा कोणत्याही प्रकारे देण्या-घेण्याचा व्यवहार नाही किंवा आपशी दुष्मनी नाही. "तक्रारदार यांनी,दिलेल्या तक्रारीवर दोन्ही पंचानी,तक्रारदार यांनी व समक्ष म्हणुन मी सुध्दा सही केली.
तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन दिनांक 14/08/2025 रोजी कामरगाव पोलीस चैकी येथील शेखर तायडे पोलीस शिपाई यांची पडताळणी आयोजीत करण्याचे ठरले.वरुन आम्ही,दोन्ही पंच व लाप्रवि स्टाफ सर्व साहीत्यासह सरकारी वाहनाने पडाताळणी कारवाई करीता ग्राम खेर्डा येथे गेलो.तेथे तक्रारदार व त्यांचा मित्र मंगेश मसनकार असे भेटले. तक्रारदार यांचे विनंतीवरुन पुढील कारवाई करीता कामरगाव जवळील हॉटेल रुद्रछाया येथे गेलो. पडताळणी दरम्यान तक्रारदार व शेखर तायडे यांची पोलीस चौकीसमोर भेट झाली भेटी दरम्यान तक्रारदार हे पोलीस शिपाई शेखर तायडे यांना म्हणाले की, राम राम काय 15 ऑगष्ट ची तयारी चालु आहे.त्यावर पोलीस शिपाई शेखर तायडे तक्रारदार यांना म्हणाले की, कसं करता, त्यावर तक्रारदार म्हणाले की, तुम्ही सांगा मग आता काय पाहुन घ्या... साहेब त्या दिवशी ते रेड जे पडली समजा..त्यावर तक्रारदार यांना पोलीस शिपाई शेखर तायडे म्हणाले की, माहिती आहे आणलीनं...फोटो दाखवु का तुम्हाले,त्यावर तक्रारदार म्हणाले की,हो शाईन होंडा आपली हीच हीच गाडी आहे ते 200 मिटर दुर होती स्पॉट पासुन,त्यावर पोलीस शिपाई शेखर तायडे हे तक्रारदार यांना म्हणाले की, 200

मिटर...200 मिटर काय दुर होती का स्पॉट पासुन अण हे कोण सांगीतली तुम्हाले स्पॉट पासुन 200 मिटर दुर 500 मिटर दुर हे कोणं सांगीतलं तुम्हाले, त्यावर तक्रारदार म्हणाले की,नाही आता कसं मंदीरात गेलतो साहेब मी दर्शनाले,त्यावर पोलीस शिपाई शेखर तायडे, तक्रारदार यांना म्हणाले की, पैशाची शुटींग पाहायची का? तुम्हाले दाखवतो काही हरकत नाही,त्यावर तक्रारदार म्हटले की,बरं मी काय म्हणतो निपटुन टाका काय आहे तं हे तं फोटोच काढला हे त त्यानं सांगीतलं,त्यावर पोलीस शिपाई शेखर तायडे, तक्रारदार यांना म्हणाले की,सगळयाहनं पाच - पाच केले,त्यावर तक्रादार म्हटले की,पाच - पाच हजार रुपये देले का सगळयानं साहेब माह्या जवळुन एव्हढे पाच हजार रुपये घेउ नका बाँ, त्यावर पोलीस शिपाई शेखर तायडे तक्रारदार यांना म्हणाले की,एक काम कर तिन मध्ये करुन टाका,त्यावर तक्रारदार म्हणाले की,तिन हजार रुपये कधी देउ साहेब मंग ?,त्यावर पोलीस शिपाई शेखर तायडे तक्रारदार यांना म्हणाले की,आत्ताच,त्यावर तक्रारदार म्हणाले की,अहो तुम्ही अँडजेस्ट करा तुम्हा मी देतो न तिन हजार रुपये तुम्ही बोलल्या प्रमाणं कसं आहे एक मिनीटं ऐका मले थोडी सवलत तं दया म्हणजे कसं रक्षा बंधनाले गेलतो.. होते नव्हते पैसे खर्च झाले अण त्या दिवशी, त्यावर पोलीस शिपाई शेखर तायडे, तक्रारदार यांना म्हणाले की,हे सोबतचं कोण आहे ? (पंच क्र01 यांना उद्देशुन विचारले), त्यावर तक्रारदार म्हणाले की, माहय मावस भाउ हाये ते काही टेंशन नका घेउ आपले माणसं आहे चला साहेब कॉल करु का उदया मंग? उदया नाही तं मंग जसं आले तं काही टेंशन नाही, त्यावर पोलीस शिपाई शेखर तायडे, तक्रारदार यांना म्हणाले की,परवा परवा.असे तक्रारदार व पोलीस शिपाई शेखर तायडे या दोघामध्ये लाच मागणी संबंधाने बोलणी झाली.यावरुन कामरगांव पोलीस चौकी,पो.स्टे.धनज येथील पोलीस शिपाई,शेखर तायडे,यांनी तक्रारदार यांना जुगार रेड च्या गुन्हयात नाव न टाकण्यासाठी तसेच दुचाकी जप्त न करण्यासाठी 3,000/-रुपये स्पष्ट लाचेची मागणी केल्याचे निष्पन्न झाले.व सदर लाचरक्कम ही 2 ते 3 दिवसांनी स्विकारणार असल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार दि.18/08/2025 रोजी पोलीस शिपाई शेखर तायडे ,कामरगांव पोलीस चौकी,पो.स्टे.धनज यांचेवर सापळा कारवाई ही करण्याचे सर्वानुमते ठरविण्यात आले.

दि.18/08/2025 रोजी सापळा कारवाई करीता आम्ही पोनि गायकवाड ,लाप्रवि पथक ,दोन्ही पंच व तक्रारदार असे सापळा कारवाई करीता कामरगाव जवळील हॉटेल रुद्रछाया येथुन सापळा कारवाईचे आयोजन केले. तक्रारदार यांना लाच रक्कमेसह पंच क्र.01 यांचे सोबत पोलीस शिपाई शेखर तायडे यांना भेटण्या करीता पाठवीणे असल्याने शेखर तायडे यांना फोन करुन भेटीसाठी कुठे येवु अशी विचारणा करण्या करीता, तक्रारदार यांनी पंचासमक्ष आलोसे शेखर तायडे, यांना स्पिकर सुरु करुन कॉल लावला असता आलोसे शेखर तायडे यांनी कॉल घेतला नाही.त्यानंतर तक्रारदार यांचे मित्र मंगेश मसणकार व पंच क्र.02 यांना आलोसे शेखर तायडे हे कामरगांव पोलीस चौकी येथे हजर आहेत किंवा कसे? असे कोणालाही शंका येणार नाही असे जावुन पाहावे.असे आमचे सांगणेवरुन,पंच क्र.02 व मंगेश मसनकार यांनी, कामरगाव पोलीस चौकी येथे जाउन बघीतले असता, आलोसे शेखर तायडे, पोलीस शिपाई हा हजर नसल्याचे आम्हाला परत येवून सांगीतले.त्यामुळे सर्वानुमते कारवाई स्थगीती करण्यात आली. तक्रारदार यांचा फोन आल्यावर पुढील कारवाई करण्याचे ठरविले. त्यानंतर आम्ही सतत तक्रारदार यांचे संपर्कात होतो. परंतु तक्रारदार यांचे बहीनीची तब्येत खराब असल्याने व तक्रारदार यांची सुध्दा तब्येत ठिक नसल्याने तक्रारदार हे काही दिवस सापळा कारवाई साठी हजर येवू शकले नाही. त्यांचा याबाबत दि.03/10/2025 रोजी पंचासमक्ष सविस्तर जबाब नोंदवीण्यात आला.

दि.15/10/2025 रोजी तक्रारदार यांचा आम्हाला फोन आला व त्यांनी सांगीतले की, पोलीस शिपाई शेखर तायडे हा पोलीस चौकी कामरगाव येथे हजर आहे. त्यामुळे सापळा कारवाई करण्याचे ठरले.सापळा कारवाई करीता पोउपअधि जगदीश परदेशी,आम्ही,दोन्ही पंच व लाप्रवि स्टाफ असे सरकारी वाहनाने जलालपुर फाटा कामरगाव रोड येथे पोहचलो.तक्रारदार व त्यांचा मित्र मंगेश मसनकार सुध्दा तेथे आले.त्यानंतर पोलीस चौकी कामरगाव येथे सापळा कारवाईचे आयोजन केले असता, पोलीस शिपाई, शेखर तायडे यांना तक्रारदार यांचे हालचालीवर संशय आल्याने पोलीस शिपाई, शेखर तायडे यांनी लाच रक्कम स्विकारली नाही... त्यानंतर पोलीस शिपाई, शेखर तायडे यांनी तक्रारदार यांना मागील दहा दिवसापासुन कोणत्याही प्रकारे संपर्क केला नसुन तक्रारदार यांचे हालचालीवर संशय आल्याने आता पोलीस शिपाई शेखर तायडे हे तक्रारदार यांचे कडुन लाच रक्कम स्विकाणार नाहीत यांची त्यांना खात्री झाली.

आहे.याबाबत दि.27/10/2025 रोजी तक्रारदार श्री संजय वामनराव कोल्हे यांनी ला.प्र.वि. कार्यालयात हजर येवून दिलेल्या जबाब नुसार पंचनामा तयार करण्यात आला आहे.

तरी दिनांक 14/08/2025 रोजी सायंकाळी 19.25 ते 22.50 वा.दरम्यान पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री शेखर तायडे यांनी तक्रारदार यांना जुगार रेड च्या गुन्हयात नाव न टाकण्यासाठी तसेच दुचाकी जप्त न करण्यासाठी 5,000/- रुपये लाच मागणी करुन तडजोडी अंती 3,000/- रु लाच मागणी केली व लाच रक्कम स्विकारण्याची

तयारी दर्शविली.त्यावरुन आरोपी लोकसेवक,शेखर श्रीधर तायडे,वय 38 वर्ष, पद- पोलीस कॉन्स्टेबल, ब.नं. 1223 नेमणुक- कामरगाव पोलीस चौकी, पोलीस स्टेशन धनज, जि.वाशिम यांचे हे कृत्य कलम 7 भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम 1988 प्रमाणे होत असल्याने माझी त्यांचे विरुध्द सरकारतर्फे कायदेशिर फिर्याद आहे(अल्का.एम. गायकवाड) पोलीस निरीक्षक, ला.प्र.वि.वाशिम

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:**
(प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

**or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):
GAJANAN Vitthal WAR
**Rank** (पद): HC (Head Constable) **No.**(क्र.): POBN79622
**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):

**or** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):

A.M. Gaikwad

15. **Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

**Signature of Officer incharge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BHARAT UTTAMRAO
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.):